
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर
तरुण भारत

आषाढ शु ११ , युगाब्द ५१२८
शनिवार, २५ जुलै २०२६





**'सुखाचे हे सुख, श्रीहरी मुख ' असलेला 'बाप रखुमादेवीवरू' पंढरपुरी उभा आहे. थोडाथोडका नाही. तर 'युगे अठ्ठावीस.' भक्तांच्या दर्शनासाठी हे सावळे परब्रह्म विटेवर उभे ठाकले आहे. पण सकल संत सज्जनांचा हा सोयरा तिथे कसा आला याची एक सुंदर कथा सांगितली जाते.**

# विठ्ठल सोयरा...

आषाढी विशेष

विश्वास देशपांडे

भ्र. ९४०३७४९९३२

**जशी** भगीरथाने भगीरथ प्रयत्न करून पृथ्वीवर गंगा आणली तसंच पांडुरंग अवताराचं श्रेय आपल्याला भक्त पुंडलिकाला द्यावं लागेल. पुंडलिक आपल्या मातापित्यांची सेवा करत होता आणि ते पाहून भगवंत प्रसन्न झाले आणि त्याच्या भेटीला आले. पुंडलिकाने मग त्यांना उभे राहण्यासाठी एक वीट पुढे केली. ही कथा आपल्या सगळ्यांना बहुतेक माहिती आहे परंतु त्यापेक्षा एक अगदी वेगळी कथा सांगितली जाते. पुंडलिक हा भगवान शंकरांचा परम भक्त होता. त्याने कठोर तपश्चर्या करून शंकराला प्रसन्न करून घेतले. तो महादेवाला म्हणाला, देवा, तुम्ही ज्या दैवताची उपासना करता ते मला कुठे आणि कसे मिळेल ? भगवान शंकर म्हणाले, मी तुला एक लोहदंड देतो. हा लोहदंड ज्या ठिकाणी पाण्यात तरेल, तिथे तुझे दैवत तुला भेटेल. हा लोहदंड चंद्रभागेमध्ये तरला. आता आपल्याला आपले इच्छित दैवत इथेच मिळेल म्हणून पुंडलिकाने आर्ततेने भगवंताचा धावा सुरु केला. साक्षात नारायण सगुण रूपात प्रकट झाले. पुंडलिका, तुला काय हवं आहे ते सांग? पुंडलिक म्हणाला, देवा, मला माझ्यासाठी काही नको. पण जडजीवांचा उद्धार व्हावा, अनाथांना सनाथ करावे आणि संसारबंधनातून हे जीव उद्धरून जावेत अशी माझी उत्कट इच्छा आहे. तेवढी इच्छा पूर्ण कर. ज्ञानदेवांनी विश्वाच्या कल्याणासाठी जसे पसायदान मागितले, तशीच ही मागणी होती. परमेश्वराने पुंडलिकाची मागणी पूर्ण केली. पुंडलिकाने भक्तीचे बीज पेरले होते. त्याच शेतीची मशागत पुढे संतांनी केली. भीमेकाठी भक्तीचा मळा फुलत राहिला. अमाप पीक येत गेलं. वारकऱ्यांनी, संतांनी यात खंड पडू दिला नाही. तेव्हापासून हे सावळे परब्रह्म विटेवर उभे आहे. तुकाराम महाराज म्हणतात

*स्वयंभू हा माझा विटेवरी उभा।*
*चैतन्याचा गाभा पांडुरंग ।*
*नाही घडविला नाही बैसाविला ।*
*भेटावया आला पुंडलिका ।*

*याच अभंगात ते पुढे म्हणतात*
*द्वारकेची अवघी संपदा घेऊनी ।*
*आले चक्रपाणी पंढरीसी ।*
*तुका म्हणे मुर्त घडली जे म्हणती ।*
*तया मुखाप्रती किडे पडो।।*

असा साक्षात वैकुंठीचा राणा इथे उभा आहे. सावळ्या रंगातील मूर्तिमंत सौंदर्य इथे उभे आहे. ज्ञानेश्वर माउली म्हणतात,' अगणित लावण्य तेज पुंजाळले, न वर्णवे तेथीची शोभा.' पण असं असलं तरी त्याचा साधेपणा तरी किती! त्याला रत्नजडित वा सुवर्णाचं सिंहासन नकोच आहे. तो आपला साधा विटेवर उभा. ही वीट आपल्याला खूप काही सांगून जाते. मातीपासून बनलेली. पंचमहाभुतांचं प्रतीक. आपल्याला जणू सांगते, या मातीशीच तुझं नातं जडलेलं असू दे. मातीतून आला आहेस. शेवटचा मुक्काम तिथेच आहे. जीवनाचं क्षणभंगुरत्व लक्षात घे. ही माती वीट करताना भाजली जाते. म्हणजे जणू काम, क्रोध, लोभ या सारख्या षड्विकारांना नाहीसं करते. तेच आपणही करायचं. शेकडो वर्षांपासून सुरु असलेली ही वारीची परंपरा. वारीची सुरुवातच मुळी आपण माया, मोह, संसारसुख निदान काही काळापुरतं का होईना पण बाजूला ठेवून करतो. सगळं काही मागे सोडून वारकरी बाहेर पडतो. विठुरायाच्या ओढीनं तो खुशीनं ऊन, वारा, पाऊस सगळं सोसण्याच्या तयारीनं बाहेर पडतो. वारीत अहंकार गळून पडतो. 'मी' मागे पडून आपण सारे असा हा प्रवास असतो. सगळेच एकमेकांच्या पाया पडतात. सगळेच' माउलीरूप' होतात. सारे भेद गळून पडतात. वारी एकतेचं प्रतीक आहे.' एखाद्या नदीला ज्याप्रमाणे लहान मोठे ओहोळ, नद्या येऊन मिळतात, तसे सगळे वारीत एकत्र येत जातात. त्यांचा एक मोठा प्रवाह होतो. पंढरपूरच्या सागरात विलीन होण्यासाठी या सगळ्या नद्या त्या दिशेने वाटचाल करतात.

विठ्ठल हे दैवत म्हणजे संतांचे माहेर! माहेर म्हणजे मुक्त वागण्याचं स्वातंत्र्य देणारं हक्काचं ठिकाण. इथे नवस, उपासतापास नाहीत. कठोर नियम नाहीत. उपास केला काय आणि नाही केला काय तो रागावत नाही. ' माउलीच ' ती. आई कधी आपल्या मुलांवर रागावते का ? लांबून आलेल्या भक्तानं तिच्या पायावर डोकं ठेवलं की झालं. त्याचे सगळे श्रम ती हरण करते. त्याची दुःखं तिच्या पायी विसर्जित होतात.

काही वारकरी तिच्या पर्यंत पोचतात. काही नाही पोहोचू शकत. लांबूनच दर्शन घेऊन धन्य होतात. माउली रागावत नाही. इथपर्यंत येऊन माझ्या पायावर आपला माथा का टेकवला नाहीस असं म्हणत नाही. तिच्या आशीर्वादाचे किरण सगळ्यांपर्यंत पोचतात. संतांनी तर या माउलीवर किती प्रेम केलं! ते विठ्ठलमयच होऊन गेले. संत सावता माळी यांना तो आपल्या पिकात दिसला.

गोरोबांना मडकी घडवताना, जनाईला दळण दळताना तो समोर होता. त्याला प्रेमाने आणि हक्काने कोणी रागावून अपशब्द वापरले. कोणी त्याला पंढरीचा चोर म्हटले, तर कोणी पंढरीचे भूत! कोणी त्याची लाज काढली. (पान ७ वर )

**महाराष्ट्राचं दैवत आणि वारकऱ्यांचा पंचप्राण म्हणजे पंढरीत भक्तांच्या भेटीसाठी विटेवर उभा असलेला सावळा सुंदर गोजिरा विठ्ठल. दरवर्षी आषाढी वारीला जगाच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी याच्या भेटीसाठी आतुरलेले असतात. कशासाठी? काही मागण्यासाठी का? तर याचं सरळ सरळ उत्तर म्हणजे नाही...! मग ऊन वारा पाऊस यांची तमा न करता खाण्यापिण्याची झोपण्याची चिंता न करता शेकडो मैल पायपीट करायची ती कशासाठी? हा प्रश्न सर्वसामान्यांना पडणं सहाजिकच आहे. कुणा कुणाला तर हा निव्वळ वेडेपणा वाटेल, बावळटपणा वाटेल. पण याचा थोडा बारकाईने पण सविस्तर अभ्यास केला तर एक गोष्ट लक्षात येईल की, एखादा दुसरा माणूस वेडा,बावळट असु शकेल पण लाखो... त्यातही शिकले सवरलेले, देशी-विदेशी आभ्यासक, विचारवंत पाहिले की वाटतं, ते बावळट किंवा वेडे नाहीत तर त्यांच्या निष्काम कर्म,भक्ती आणि ज्ञानावर शंका घेणाऱ्यांनी जरा शांतपणे या गोष्टीचा सारासार विचार करावा. असो.**




# वारीचा सोहळा, भक्तीचा जिव्हाळा

आषाढी विशेष
प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी
भ्र. ९४०३०२९१७८

**वारीची** परंपरा माऊलींच्या अगोदर पासूनची आहे. पण या वारीला कर्म भक्ती आणि ज्ञान सोपे करून सांगण्यासाठी आणि समाज जागृतीचं महान कार्य करून समाजातील अत्यंत घातक असा भेदाभेद नष्ट करून एक आदर्श समाज निर्माण करण्यासाठी समुह साधने सारखं दुसरं साधन नाही. हे मर्म माऊलींनी ओळखलं होतं. म्हणून साडे सातशे वर्षापूर्वी माऊलींनी या वारीला समुह साधनेचं रूप दिलं. आणि पवित्र अशा कार्याला सुरुवात केली. या महान कार्याचा श्री निवृत्तीनाथ, श्री सोपान श्री मुक्ताबाई, श्री एकनाथ, श्री नामदेव याबरोबरच सर्व संतांनी स्विकार तर केलाच पण अतिशय प्रेम,भक्ती भावाने वारीत सहभागी झाले. यावर कळस चढवला तो जगद्गुरु श्री तुकोबारायांनी. आणि आज ही वारी तुमच्या आमच्या सर्वांचाच श्वास झाली आहे. एवढंच नाही तर ही आषाढी वारी महाराष्ट्राची अध्यात्मिक व सांस्कृतिक ओळख झाली आहे. संतांच्या मांदियाळी सोबत परब्रह्म परमात्मा पांडुरंगाच्या अस्तित्वाची प्रत्यक्ष अनुभूती घेणे म्हणजे ही वारी आहे. पण त्यासाठी...

**काया वाचा मने। करील जो वारी।। अनुभवे हरि। भेटे तया ।।१।।**

मायबाहो, वारीत हरि निश्चितच भेटतो यात शंकाच नाही. पण कोणाला भेटेल? तर जो काया, वाचा मनानं पूर्णपणे वारीत सामिल झालेला आहे त्यालाच भेटेल. ज्यांच्यात विठ्ठला प्रती निष्काम भावा बरोबरच समर्पित भाव जागृत होऊन वारीत विठ्ठलरूपाशी एकरूप झालेला आहे, त्यालाच तो भेटेल. थोडक्यात काया वाचा मनाने जो ही पंढरीची वारी करेल त्याला हरिची म्हणजेच परब्रह्म परमात्मा पांडुरंगाची निश्चितच भेट होईल. पण ती कोणत्या रूपात होईल ते सांगता येत नाही. ते आपल्याला ओळखता आलं पाहिजे, त्यासाठी आपले अष्टसात्विक भाव जागृत असयला हवेत.

**या वारीचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे...**

**येथे उच-निच। नाही भेदाभेद।। आनंदाचा स्वाद। जीव चाखी ।।२।।**

श्रीमंत- गरीब, लहान- थोर, स्त्री- पुरूष असा कोणताही भेदभाव असेल तर तिथे निखळ आनंद कसा मिळेल? जिथे मी आणि माझे हा अहंभाव आहे, द्वैत आहे, तिथे सुख शांती समाधान मिळणारंच नाही. मी, माझे-तुझे हा द्वैत भाव संसारात असतो. म्हणून तर माझे तुकोबा सांगतात की बाबांनो...

**संसार दुःख मुळ चोहिकडे इंगळ। विश्रांती नाही कोठे रात्रंदिन तळमळ।।**

संसारात सुख, समाधान, विश्रांती क्षणभर सुद्धा मिळत नाही. म्हणून हा संसार सोडायचा का? तर नाही असं एकाही संतांनी आम्हाला सगितलं नाही. माऊली तर हरिपाठात सांगतात की...

**असोनी संसारी जीव्हे वेगु करी। वेदशास्त्र उभारी बाह्या सदा ।।**

पण कधी तरी संसारातून वेळ काढावा आणि ही पंढरीची वारी नियमितपणे करावी. वारीत सर्व भेदभाव गळून पडतात, सारं द्वैत गळून पडतं, संसाराचा विसर पडतो. **भेदाभेद भ्रम अमंगळ...याची अनुभूती येते. उरते ती फक्त आणि फक्त माऊली... माऊली...** हाच भाव. आम्हा वैष्णवांना विठु माऊली आणि ज्ञानेश्वर माऊली वेगळे वाटतच नाहीत. कारण... **महाविष्णूचा अवतार। सखा माझा ज्ञानेश्वर।।** अशी माझी जनामाय आम्हाला सांगते. माऊलींची पालखी आमच्या सोबत असते म्हणूनच आता आम्हाला प्रत्येकात माऊलीच दिसते. कारण आम्ही काया वाचा मने वारीत समर्पित झालेलो आहोत. जिथं द्वैत सरतं आणि अद्वैत उरतं तिथं फक्त आनंदच उरतो. त्या आनंदाचा स्वाद चाखण्याचं भग्य या पमर जिवला लाभतं. तेव्हा **जन्मोजन्मी आम्ही बहु पुण्य केले। तेव्हा या विठ्ठले कृपा केली।।** याची अनुभूती येते. हीच तर आपल्या पांडुरंगाची आणि माऊलींची भेट असते ना मायबापहो... **प्रेमाचा सागर। सुखाची भरती।। ओवाळु आरती। चैतन्याची ।।३।।**

ही आषाढी वारी आम्हा वारकऱ्यांची एवढी जिव्हाळ्याची आहे की, तिची महती गाताना आणि वर्णन करताना शब्द अपुरे पडतात. कारण आता माया मोहात अडकवणाऱ्या संसाराचा पूर्णपणे विसर पडलेला आहे. आणि आता इथे सर्वच जण एकमेकांचे माऊली असल्यामुळे तिथे फक्त आणि फक्त प्रेमाचाच वर्षाव असतो. राग, द्वेष, निंदा,नालस्ती अशा तुच्छ गोष्टीला इथे थाराच राहात नाही. ज्याप्रमाणे सूर्यासमोर अंधार टिकत नाही, त्याचप्रमाणे वारी सोबत ज्ञानसूर्यच (माऊलीच) सोबत असल्यामुळे अशा अज्ञानरूपी गोष्टीला थारा मिळेलच कसा? म्हणून तर आमचे शांती ब्रह्म एकनाथ महाराज म्हणतात की, **प्रेम सुख देई प्रेम सुख देई। प्रेमावीण नाही समाधान ।।**

वारीत एकाच वेळी तीन प्रकारच्या प्रेमाची अनुभूती येते. भक्त आणि संत, भक्त,संत आणि पांडुरंग, भक्त आणि भक्त. इथे जो कोणी येतो तो या प्रेम रसात चिंब चिंब होऊन जातो, माऊलीमय होऊन जातो. कारण हा वारीचा अनुपम्य सोहळा म्हणजे प्रेमाचा सागरच आहे. आणि या सागराला प्रेमाची सदैव भरतीच आलेली असते. इतर सागराला भरती बरोबर ओहोटी ही येतेच. पण वारीतील या प्रेम सागराला ओहोटी कधीच येत नाही. कारण मुळातच ही वारी आनंदाचा कंद आहे. प्रेम, सुख, समाधान यांची वाणवा इथे कधीच असत नाही. संतांच्या मांदियाळीत ही वाणवा राहिलच कशी? म्हणून मायबापहो ज्योतीने तेजाची (सूर्याची ) आरती केल्याप्रमाणे आपणही प्रेमाचा सागर असणाऱ्या या वारीला चैतन्याच्या आरतीने ओवाळू या. यामुळे काय होईल? तर...

**ऐके माझा विठु । धावा अंतरीचा ।। खेद अंतरीचा । हारे विठु ।।४।।** वारीत जेव्हा आपण संसार, व्यवहार,ऐहिकपण,आप-पर भाव,सुख-दुःख सारं सारं विसरून जातो, आहो एवढंच काय स्वतःलाही विसरून जातो आणि विठुच्या नामाच्या गजरात एकरूप होऊन जातो. आणि त्याला आर्ततेने साद घालतो तेव्हा आपला विटेवर उभा असलेला भक्तांच लळा असलेला आपला विठुराया आपली हाक निश्चितपणे ऐकतो आणि वारीत आपल्यासंगे नाचू लागतो. तेव्हा आपल्या नकळत एक अद्भुत अशी गोष्ट घडते मायाबापहो. ज्याची आपल्याला कल्पनाही नसते ती म्हणजे, आपल्या अंतरीच्या साऱ्या संसारीक दुःखाचं, खेदाचं क्षालन होतं. नकारात्मक विचाराला मुठमाती दिली जाते. एक नवी सकारात्मक ऊर्जा आम्हाला मिळते. त्यामुळे संसारात कितीही कठीण समस्या आल्या, प्रसंग आले तरी त्यांचा सामना करण्यासाठी आम्ही खंबीरपणे उभे राहतो. कारण आमच्य समोर दुःखाचा किंवा खेदाचा डोंगर जरी उभा असला तरी त्याचं हारण करण्यासाठी विटेवर उभा असलेला आमचा बाप समर्थ आहे ना? मग आम्हाला कसली आलीय भय,चिंता?

**दिसता कळस । स्थितप्रज्ञ झाला ।। नाना विसावला। विठु पायी ।।५।।** शेकडो मैलाची पायपीट करून जेव्हा पंढरीच्या वेशीत आलो तेव्हा सारं अंग अंग रोमांचित झालं. माहेरी आल्याचं सुख रोमारोमातून ओसंडु लागलं.

**भेटी लागे जीवा लागलिसे आस। पाहे रात्रंदिन वाट तुझी।** अशी अवस्था मनाची झाली होती. कधी एकदा माझ्या विठु माऊलीला भेटु असं झालंय आता. एकेक क्षण म्हणजे वर्षासारखा भासु लागलाय. आता माझ्या माऊलीला भेटायचय, माझ्या अनाथपणाला तिलांजली द्यायचीय. अंतरात व्याकुळता दाटून आलीय. **नको देवराया अंत आता पाहू । प्राण हा सर्वथा जाऊ पाहे ।।** अशी अवस्था झालीय ह्या जीवाची. विठ्ठला,पांडुरंगा, मायबाप एकदा दर्शन देना रे या पामराला. जीव व्याकूळ झाला असतांनाच समोर मावळतीच्या सूर्य किरणांनी उजळून निघालेला मंदिराचा कळस डोळ्यासमोर दिसला, आणि कृतार्थ झालो. अष्टसात्विक भाव एकाच वेळी जागृत झाले. आणि वाचेनं मौन धारण केलं, देह स्तंभासारखा झाला, साऱ्या जाणिवा नेणिवा संपल्या. डोळ्यातून इंद्रायणी चंद्रभागा वाहु लागल्या. मनासह देहाला स्थितप्रज्ञता प्राप्त झाली. **जन्मोजन्मी आम्ही बहु पुण्य केले। तेव्हा या विठ्ठले कृपा केली ।।**

विठ्ठला मायबापा तुझी कृपा आहे. म्हणूनच या वारीचा मी पाईक होऊ शकलो. आता एवढीच कृपा करावी की, तुझ्या पायाला जी मिठी मारलीय ती सैल होऊ देऊ नकोस बाबा. या त्रिभुवनात या सारखा परमसुखाचा विसावा दुसरा कुठं आहे देवा? जन्मोजन्मी तुझ्या चरणाचा दास होऊन राहुदे मला.

देवा, तुझ्या कळसाचं दर्शन झलं, पायाला मिठी मारली आणि माझं जन्मोजन्मीचं भाग्य फळाला आलं. **आता कोठे धावे मन। तुमचे चरण देखेलिया ।।** अशीच पुन्हा पुन्हा मनाची अवस्था होते. तुझा सहवास सोडवत नाही, पण संसाराच्या जबाबदाऱ्या शांत बसु देत नाहीत देवा. **जातो माघारी पंढरी नाथा। तुझे दर्शन झाले आता।।** असे म्हणत डोळे टिपत परतीच्या प्रवासला लगलो खरा, पण मन मात्र अजूनही विठुरायाच्या चरणाशीच रेंगाळत आहे. **वारीचा सोहळा। भक्तिचा जिव्हाळा ।। दाटला उमाळा।। अंतरात।।** ही अवस्था मात्र कायमच राहाणार आहे. आषाढी वारीच्या सर्व भाविकांना मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा! माऊली... माऊली... माऊली...



# समचरण...

आषाढी विशेष

देवेंद्र जी. औटी

मायंदाळ पळविलं गा! या क्षणिक माया मोहांनी ।।
नाही गा नाही रमला तुमच्या कोलाहलात जीव माझा घाबराघुबरा होयाचा।।
आता नामदेव पायरी होऊनीया कधीचाच ठेलो गे म्या माये ।।
हुडकु नका गा मला, बघा नीट देह माझा कैचा
बेटा कधीचा होऊनी बैसला विठु चरणाखाली निमुट ती विट।।
मागतोय बा! पांडुरंगा! होऊनीया मागतकरी एकची दान ते त्वा मज द्यावे।।
माझे मनमंदिरी प्राणिमात्रासह कुणा मनुष्यजीवा विषयी किंतु,
किल्मिष यत्किंचितही नसावे।।
माझ्या जीवन प्रवासात निमित्ताने आलेल्या हरेक
लहानथोर मनुष्याचे जीवन मनोवांछित कल्पद्रुमापरी फलावे।।
मज देहमंदिरी असावा दयेचा भाव नि बा ज्ञानोबा!
निव्वळ शुद्ध करुणारसची पाझरावे।।
वासना, धन,सोने नको तो विषय जागा जमीन फुलाचा मोठेपणा,
पद पदवी, डामडौल,भौतिकांप्रति माझे मन यश्किंचितही न गुंतावे।।
अंतरी अध्यात्मिक तरल भावनेच्या उंचीवरती ते सदा
म्या चराचरात अखंडित बा!विहरावे।।
अश्वासत, क्षणभंगुर या जीवनाला सुवर्णकोंदण
तुज भक्ती आशिर्वादाचे सजावे।।
तुवाच दिलेल्या माती पाणी हवा पृथ्वी तेज वायु पंचमहातांतुनी
उपजलेल्या या देहाचे अवघे अवघे अखेरीस चंदनचि व्हावे।।
हे पद्मनाभा नारायणा! छळती कोणी मज कोण त्या संकुचित भावे
मज तुज समान प्रचंड क्षमाशीलचि करावे।।
फकिरी झोळीत मम ! काय म्या आणखी मागावे? ।।
पाप पुण्याचे गाठोडे अवघे निरंक करुनिया हे! मधुसुदना!
तुजकडे मला मोकळेढाकळे घेऊनिया यावे।।
मागतो बा! जगन्नियंत्या कृपाळु बा ज्ञानेश्वरा !एकची दान ते त्वा पुरवावे।।
हे, करुणाब्रम्ह महाविष्णु! होई धन्य जन्म ऐसे समचरण
तुझे माझिया अंतिम समयी दावावे।।
आणि..आणि...हे समाधिस्थ महाराजा, चक्रधरा,अनंता!
मज तुझिया मांडीवरती अर्भकबाळ म्हणुनी आईचे वात्सल्याने
पवित्र ते स्थान दयावे।।
तितुकी माझी पायरी नोहे गा बापरखमादेवी वरदा!
परी आलो तुज पायरीवरती उद्दामपणाने, लाडाने लडिवाळा!
मम पसायदान तुचि बा जगव्यापका जनार्दना जी! केशवा पुरवावे।।

# वारीची अनोखी अनुभूती...



आषाढी विशेष

उज्वला केसकर

**काही गोष्टींचा योग यावा लागतो. आपण कितीही ठरवलं तरी कोणती अनुभूती आपल्या हृदयाला केव्हा स्पर्श करेल, याचं गणित आपल्या हातात नसतं. यावर्षी असाच एक योग आला. कशी कोणास ठाऊक, पण वारीला जाण्याची प्रबळ इच्छा झाली. याआधी हा विचारही मनात आला नव्हता; यावर्षी मात्र जायलाच हवे, असे मनोमन वाटत राहिले. साहजिकच उरी प्रचंड धाकधूक होती. पण विठ्ठल कृपेने वारीच्या वाटेवर सुखाची अनुभूती घेतोय...**

एखादी गोष्ट करायची ठरवल्यावर ती तडीस न्यायची सवय इथेही वापरायची ठरवली आणि मानसिक तयारी करण्याच्या मागे लागले. माउलींच्या पालखीसोबत चर्होलीहून पुण्याला यायचे ठरवले. त्या दिवशी पहाटे ५ वाजता रिक्षाने आळंदीला पोहोचलो. रस्ते बंद असल्यामुळे शक्य तितके अंतर रिक्षाने गेलो. चर्होलीला उतरल्यावर एका छोट्याशा हॉटेलमध्ये नाश्ता केला आणि पालखीची वाट बघत बसलो. साधारण अर्ध्या तासात संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी नजरेला पडली. पालखी आली, पालखी आली असा कोलाहल चालू असतानाच फुलांनी मढवलेली सुंदर पालखी दिसली आणि इतक्या प्रचंड गर्दीमध्येही देहभान हरपणे अनुभवायला मिळाले.

माउलींच्या पालखीला सहा बैलजोड्या जुंपल्या जातात. याआधी त्या बैलजोड्यांची कीव यायची; पण त्या क्षणी बैलांच्या भाग्याचा मला कोण हेवा वाटला... वारीच्या काळात संपूर्ण रस्ता दिंडीसाठीच मोकळा ठेवलेला असतो. रस्त्याच्या मध्यभागातून दिंड्या जात असतात आणि त्यांना क्रमांक दिलेले असतात. रथाच्या पुढून, मागून आणि आजूबाजूने जनसमुदाय चालत असतो. वारकर्यांमध्ये अतिशय शिस्त असते. ते वाटेत कुठेही पाणी पिण्यासाठी, खाण्यासाठी थांबत नाहीत. वेगाने चालत असूनही टाळ-मृदुंगाची लय, अभंगाची गोडी यात कधीही बाधा येत नाही. ही शिस्त खूप वाखाणण्यासारखी असते.

आपण कडेने चालत असतो आणि रस्त्याच्या मधून दिंड्या जात असतात. त्यांच्या टाळ- मृदुंगाच्या तालावर किती अंतर पार केले, हे लक्षातही येत नाही. उन्हाचा दाह आणि पावसाची सर यामधले काहीही जाणवत नाही. वाटेत वेगवेगळ्या राजकीय पक्षांनी बुथ उभारलेले असतात. तिथे पाणी, बिस्किटे, केळी, राजगिऱ्याचे लाडू अशा पदार्थांचे वाटप सुरू असते. दुपारी दीड वाजेपर्यंत आम्ही पालखीच्या आसपासच चालत होतो. त्यानंतर पालखीसोबतचा ताफा जेवण्यासाठी तास-दोन तास थांबला. या प्रवासात आलेले काही अनुभव कधीच नजरेआड करू शकणार नाही.

आळंदीपासून चालायला सुरुवात केल्यानंतर मध्ये लष्कराचा परिसर लागला. त्यांच्या गेटपाशी लंगरची सोय होती. इथे काही मजेशीर क्षण टिपले. त्या गेटपाशी एक उंचवट्याचा भाग होता. त्यावर काही सैनिक उभे होते. टाचा उंचावून गर्दी बघत होते. ते असे गर्दीकडे टक लावून का बघत आहेत हे समजावे म्हणून मीही बराच वेळ त्यांच्याकडे बघत होते. ते सैनिक आपल्या गावाकडून कोणी ओळखीचे आले आहे का हे गर्दीत शोधत होते. लष्करी परिसरातून वारी जाते तेव्हा सैनिकांना गावाकडचे लोक भेटतात, गप्पा मारता येतात, ख्यालीखुशाली समजते.

ओळखीची मंडळी शोधण्याचा त्यांचा उत्साह आणि भेटल्यावर झालेला आनंद बघण्यासारखा होता. काही सैनिक तुतारी वाजवणार्यांसोबत फोटो आणि व्हिडीओ काढत होते, हे बघून गंमत वाटली. एका सरदारजी सैनिकाला वारी संकल्पनेचे खूप अप्रूप वाटत होते. मोठ्या कुतुहलाने तो संपूर्ण नजारा टिपत होता. अचानक गर्दीतून कोण्या वारकऱ्याने प्रसादाची केळी त्याच्या दिशेने फेकली. साश्रुनयनांनी सैनिकाने प्रसादाला नमस्कार केला. त्याच्या चेहऱ्यावरचे कृतकृत्य झाल्याचे भाव बरेच काही सांगणारे होते.

पुण्यात आल्यावर एक सरदारजीचा मुलगा समोर आला. माँ जी, आप कबसे धूप मे चल रहे हो! पानी पी लो! असे म्हणत कुठून तरी पाण्याचा भरलेला ग्लास माझ्यासमोर आणला. इतर वेळी उघड्यावरचे पाणी प्यायचा विचारही केला नसता, पण त्याच्या आदराला मान देऊन ते पाणी प्यायले. हल्लीच्या बंद दारांच्या संस्कृतीमुळे आपल्याला अशा अगत्याची सवय राहिलेली नसते. त्यामुळे मला माणुसकीचा प्रत्येकच अनुभव विलक्षण वाटत होता. माझ्या आजूबाजूलाच यंगस्टर्सचा घोळका होता. धर्म विठोबा, कर्म शिवबा असा नारा देत टाळ-मृदुंगाच्या तालावर डोलणारी ती आयटी कम्युनिटी बघताना भलतेच आश्चर्य वाटत होते. पुण्यापर्यंत असे खांद्यावर बसवून कसे नेणार, असे विचारले असता त्याने हसून मुलाच्या उत्साहाबद्दल भरभरून सांगितले. त्याचा मुलगा अजिबात खांद्यावर बसायला तयार नव्हता. हातात टाळ घेऊन त्यालाही बोबड्या बोलांमध्ये विठ्ठलाचा नामघोष करायचा होता; पण बरंच अंतर पार केल्यानंतर बाबांनी त्याला खांद्यावर बसवले होते.

इतक्या चिमुकल्या मुलामध्ये ही आस कुठून येते, हा विचार बराच वेळ घोळत राहिला. माउलींच्या पालखीसोबत सतत एक फायर ब्रिगेड असते. त्या गाडीतले सगळे कामगार टपावर येऊन माउलींपुढ्यात नतमस्तक होत होते. ही सगळी दृश्ये मी पहिल्यांदाच बघितली म्हणूनही असेल कदाचित; पण मनात घर करून राहिली. आपण किती अनभिज्ञतेने बघतो ना काही घटनांकडे? इतकी वर्षे मीसुद्धा वारीकडे फारशा औत्सुक्याने बघत नव्हते. टीव्ही, वृत्तपत्रे यामधून मिळणारी माहिती आणि वारीला जाऊन आल्यावरचे अनुभव यात जमीन-अस्मानाचा फरक आहे, हे जाऊन आल्यावरच समजले! लाखोंच्या जनसमुदायामध्ये प्रत्येकालाच वेगवेगळे अनुभव येत असतील, पण अनुभूती एकच येते, असे मला वाटते.

आपल्याहून ताकदवान शक्तीला समर्पित होऊन एकरूप होण्याची ही अनुभूतीच लाखो भक्तगणांना एकत्र आणते. खरं तर मी, माझं, मला ही ममची बाराखडी बाजूला ठेवून एक दिवस तरी हा अनुभव घ्यायलाच हवा. वारीमध्ये फक्त मी आणि माउलीच आहोत, बाकी कोणीही नाही हा निश्चय केला की निम्मे अंतर तिथेच पार होते. 'आनंदाचे डोही आनंद तरंग'ची प्रचीती आल्यावाचून राहात नाही.

**सर्व जाती- जमातींना भक्तीप्रेमाच्या जोरावर परमेश्वराचा मार्ग मोकळा करून देणारा व परमार्थाच्या प्रांतात लोकशाहीचे रूप विकसीत करून देणारा वारकरी सांप्रदाय म्हणजे विकसित वैष्णवधर्म होय हाच त्यांचा आनंदोत्सव.**

आषाढी विशेष
रामकृष्ण अघोर
भ्र.९९७०५९५२८५

# वैष्णवांचा आनंदोत्सव

भारतीय संस्कृती ही सण, उत्सव, परंपरा, जयंती या अलंकाराने सजलेली आहे. त्याचप्रमाणे ऋतू मानाप्रमाणे व निसर्गाच्या नियमानुसार सण व उत्सव यांची सांगड घातली गेली. आपल्या सणांची सुरुवात ही हिंदु पंचागाप्रमाणे चैत्र म्हणजे उन्हाळ्याची सुरुवात या माध्यमातून सुरू होते. तसेच नरसिंह जयंतीपर्यंत म्हणजे उन्हाळा अखेर सण व उत्सवाचा पहिला टप्पा संपतो. त्यांनतर दुसरा टप्पा म्हणजे येणारा पावसाळा ऋतू यामध्ये आषाढी एकादशी ह्या उत्सावास सुरुवात होते. तो उत्सव परंपरेनुसार सणा सारखा साजरा करतात. या आषाढी एकादशीपासून सुरु होणाऱ्या सणांची अंतिम दिवाळी व त्यातल्या त्यात कार्तिक एकादशी म्हणजे प्रबोधनी एकादशी हा अखेरचा सणांचा उत्सव होय.

हिंदू पंचागाप्रमाणे प्रत्येक महिन्यात दोन पंधरवडे (पक्ष) असतात. त्यामध्ये दोन तिथी म्हणजे एक शुध्द तिथी व दुसरी वद्य तिथी या प्रमाणे आषाढ महिन्यात दोन्ही तिथीप्रमाणे शुध्द एकादशी म्हणजे देवशयनी एकादशी वद्य एकादशीला कामिका एकादशी असे नाव आहे. हा वारकरी सांप्रदायाच्या सर्वात मोठा उत्सव आहे. ह्या एकादशी उत्सवात सर्व धर्मांचे, सर्व जातीचे, सर्व पंथाचे तसेच स्त्री, पुरुष, बाल, वृध्द अशामुळे ही धर्मनिरपेक्ष असा उत्सव आहे. वैष्णवांसाठी या पवित्र दिवसाचे विशेष महत्व आहे. आषाढी एकादशीच्या दिवशी लाखोंच्या संख्येने वारकरी भक्त पंढरपूरमध्ये विठ्ठलाच्या दर्शनासाठी दाखल होतात. अध्यात्मिक व धार्मिक दृष्टीकोनातून या दिवसाला खूप महत्व आहे.

चंद्रमास गणनेतील फरकामुळे काही वेळेला जेव्हा तिथीची वृध्दी होते तेव्हा एकादशी ही दोन दिवस असते. तेव्हा पहिल्या दिवसाच्या एकादशीला स्मार्थ एकादशी व दुसऱ्या दिवशीच्या एकादशीला भागवत एकादशी असे नाव आहे. ज्या कोणा भक्ताला वर्षभर एकादशी करणे जमणार नाही. त्या भक्तांनी जर आषाढी एकादशीचा उपवास केला तर शुध्द पक्षातील बारा एकादशीचे पुण्य प्राप्त होते म्हणून या एकादशीस महाएकादशी म्हणतात. ह्या एकादशी तिथीला पावसात पाण्यात भिजत भिजत श्री. पांडूरंगाच्या भेटीसाठी कित्येक किलोमीटर अंतर पार करत करत पंढरपूरला पोहचतात. वारकरी दिंडींचा भक्ताचा सोहळा अत्यंत रमणीय, प्रेक्षणीय व अत्यंत मनोरम असा असतो. यामध्ये हजारो पालख्या, दिंड्या पंढरपूर नगरीत दाखल होत असतात. या मध्ये समावेश होणाऱ्या दिंडीचा विचार करता प्रामुख्याने आळंदी वरुन ज्ञानेश्वर माऊलीची, देहूवरुन संत श्रेष्ठ तुकाराम महाराजांची, त्र्यंबकेश्वरहून संत निवृत्तीनाथाची, सासवडहून सोपानकाका देवाची, पैठणहून संत एकनाथ महाराजांची आणि उत्तर भारतातून कबीर महाराजांची पालखी निघते. तसेच मोठ्या कालावधीची सर्व लवाजमा घेऊन श्रीमंती थाटात निघणारी संपूर्ण महाराष्ट्र व्यापून टाकणारी भव्य व दिव्य पालखी म्हणजे श्री. संत गजानन महाराज शेगाव, या ही पालखी-चा समावेश असतो. हजारो भक्तगण, वारकरी ठिक ठिकणाहून या पालखीत सहभागी होतात. लाखो लोक चंद्रभागेच्या देवदुर्लभ अशा तीर्थात स्नान करुन पापशालन करुन शरीर अंर्तरबाह्य शुध्द करुन घेतात. आषाढी एकादशी संदर्भात पद्मपुराणात एक कथा प्रसिध्द आहे. मृदुमान्य नावाच्या राक्षसाने भगवान शंकराची कडक तपश्चर्या करुन शंकराला प्रसन्न करुन घेतले. तपश्चर्येच्या बदल्यात मला कोणाकडूनच मृत्यु नसावा असा वर मागून घेतला. पण भगवान शंकराने त्याला वर देताना सांगितले की जरी कोणाकडून मृत्यू येणार नाही असा वर दिला, तरी तुला एका स्त्रीच्या हातून मात्र तुला मृत्यु येईल, असे सांगितले. शंकराकडून वर मिळताच तो उन्मत झाला आणि सर्व देवांवर स्वारी करुन त्यांचा पराभव केला. अखेर सर्व देव भगवान शंकरासह गुहेत जाऊन लपले. तिथे शंकरानी आपल्या श्वासातून एक स्त्री देवता उत्पन्न केली. तिचे नाव एकादशी ठेवून मृदुमान्य राक्षसाशी युध्द करण्यासाठी पाठवले. दोघात युध्द झाले व अखेर मृदुमान्य राक्षस त्यात मारला गेला. त्याच्या मृत्युनंतर सर्व देवांची गुहेतून सुटका झाली व त्याच वेळी पावसाला सुरुवात झाली. आधीच गुहेमध्ये उपवास घडला नंतर पावसाने सर्वांचीच आंघोळ झाली. याचेच प्रतिक म्हणून सर्व संकटावर मात करण्यासाठी उपवास करण्याची आणि चंद्रभागेत तीर्थ स्थान करण्याची प्रथा पडली. कारण वारकरी पंढरपूराला पोहचण्यापूर्वी चंद्रभागेत मोठा पाऊस येऊन चंद्रभागा तुंडूब भरते व सर्वांना तीर्थक्षेत्राचा स्नानाचा लाभ मिळतो. सर्व जाती- जमातींना भक्तीप्रेमाच्या जोरावर परमेश्वराचा मार्ग मोकळा करून देणारा व परमार्थाच्या प्रांतात लोकशाहीचे रूप विकसीत करून देणारा वारकरी सांप्रदाय म्हणजे विकसित वैष्णवधर्म होय हाच त्यांचा आनंदोत्सव.






**विठ्ठल हा केवळ शब्द नाही. तर वारकऱ्यांसाठी आण आहे, प्राण आहे. जगण्याचं वचन आहे. जीवनाचं सार आहे. विठ्ठल आमुच्या कुळीचे दैवत हा त्याचा भाव आहे. विठ्ठल या शब्दांचा पवित्र आणि गोड असा भावार्थ आहे. वि म्हणजे विधाता अर्थात ब्रह्मदेव. ठ्ठ म्हणजे निलकंठ अर्थात शंकर आणि ल म्हणजे लक्ष्मी कांत अर्थात विष्णू. विठ्ठल भीमातीरवासी, विठ्ठल पंढरीनिवासी. विठ्ठल पुंडलिकापाशी, कृपादानाशी उदार.**

आषाढी विशेष

हभप डॉ. रंगनाथ काकडे
भ्र. ८९९९६८००८९

**तमाम** भाविकांची आषाढीवारी आली की भेटीलागी जीवा लागलीसे आस, पाहे रात्रंदिवस रंगनाथ वाट तुझी अशी अवस्था होते. आळंदी, देहू, पैठण, त्र्यंबकेश्वर, शेगाव आदी करुन महाराष्ट्र व कर्नाटकातून हजारो दिंड्या व त्यासमवेत लाखो भाविक पायी वारीसाठी निघतात. ऊन, वारा, पाऊस, गावाकडील प्रपंच याची कसलीही आठवण भक्तांना नसते. कारण आत हरी, बाहेर हरी अशी त्यांच्या मनातील साठवण असते.

आषाढी, कार्तिकी विसरु नका मज हा श्री विठोबाचा एकच सांगावा या माऊलीच्या संगतीला असतो. श्री विठ्ठल हे सामान्य जनतेचे, गोरगरिबांचे श्रद्धास्थान आहे. भक्तांची वाट पाहणारा तो एकमेव देव आहे. तो अवतारांचा अवतार आहे. जेणे गीता उपदेशिली, ते हे विटेवरी माऊली. आनंद अद्वय नित्यं निरामयं, जे का निजध्येय योगियांचे. ऋषीमुनींसाठी ते निजधाम आहे तर भक्तांसाठी सर्व सुखाचे आगर आहे. सुंदर ते ध्यान, उभे विटेवरी, कर कटेवरी ठेवुनिया हे रुप डोळ्यात अखंड ठेवण्यासाठी भक्त देवाला आग्रह धरतात. ठाव देई चित्ता, राखे पायापाशी, सकळ वृत्तीशी अखंडित.

प्रापंचिक थकल्याभागल्या शोषितांसाठी, उपेक्षितांना श्री विठ्ठलनाम, श्री विठ्ठलरूप हे विश्रांती आहे. चित्ती नाही आस, त्याचा पांडुरंग दास ही अनुभूती आहे. पुंडलिक भक्तराज, तेने साधियेले काज, वैकुंठीचे निज, परब्रह्म आणिले. मागे पुढे उभा राहे सांभाळीत, आलिया आघात निवाराया. ही श्री विठ्ठलाची विशेष कृपा आहे.

विशेष म्हणजे ती मोफत आहे. तो भावाचा भुकेला आहे. शुद्ध प्रेमाने त्याला आळविल्यास तो उचिताचा दाता, कृपावंत अनंता असा परमात्मा आहे. पांडुरंगावर असणाऱ्या प्रेमाचे वर्णन करताना संत तुकाराम महाराज म्हणतात प्रेम नये सांगिता, बोलिता, दाविता, अनुभव चित्ता चित्त जाणे. तुका म्हणे वरे विचारावे मनी, आणिक भल्यांनी पुसू नये.

विठ्ठलचि एक खरा, येर तो पसारा वाडगाचि ही साधूसंत, भक्तांची मनीषा असते. संसार आलिया एक सुख आहे, आठवावे पाय विठोबाचे ही भावना अनेक सुकृतांनीच येते कारण बहुत सुकृतांची जोडी म्हणून विठ्ठल आवडी. दडी, पताकांचे भार अवघे गर्जे पंढरपूर. हरिकीर्तन, प्रवचन, हरिपाठ नामसोहळा लाखो भाविकांचा हरिनामाचा गजर पाहून स्वर्गीचे अमर ईच्छितात देवा, मृत्यूलोकी व्हावा जन्म आम्हा है। शास्त्र सांगते. बोलावा विठ्ठल, पहावा विठ्ठल, करावा विठ्ठल मनोभावे हीच वारकऱ्यांची तळमळ असते. पांडुरंग आमचा पिता, रुखुमाई आमुची माता ही त्याची आंतरिकता असते.

पांडुरंगाशिवाय साधकाला काही आवडत नाही. संत तुकोबाराय भक्ताची अवस्था सांगतात विषय तो त्यांचा झाला नारायण, न आवडे जन धन माता पिता दिनरजनी हाचि धंदा गोविंदाचे पोवाडे. विटेवरी ज्याची पाऊले समान, तोचि एक दानशूर दाता. असा असणारा श्री विठ्ठल भाविकांचं सर्वस्व आहे. तुका म्हणे देह देवासी उदार, बाप रखुमादेविवरु जोडावया हीच अवस्था भक्तांची असते. सत्य, साच आणि खरे असणारे विठोबाचे नाम घेण्यासाठी वारकऱ्यांची वाणी आतुर झालेली असते. घेई घेई माझे वाचे, गोड नाम विठोबाचे हीच त्याची ईच्छा असते. माझी मज झाली अनावर वाचा, छंद या नामाचा जडला हा तुकोबांचा साक्षीभाव होता. साधूसंतांप्रमाणेच आजही कोरोनामुळे सलग दुसऱ्या वर्षी संपूर्ण विश्वात श्री विठ्ठल भेटीचा विरह भाविकांना आहे.

श्री विठ्ठल वारी, दिंडी न घडल्याने भाविक अतृप्त आहेत. आपल्या विठुरायाच्या चरणी त्याची मागणी आहे. एक मागणे ऋषीकेशी, चित्त द्यावे सांगतो वचनाशी. मज अंतर तुझ्या चरणाशी, न घडे ऐशी कृपा करी... विठ्ठल चरणी साष्टांग दंडवत. जय हरि जय बोधराज. (लेखक संत साहित्याचे अभ्यासक आहेत.)




# विठ्ठल सोयरा

(पान २ वर) कोणी त्याच्या न्याय पद्धतीवर बोट ठेवले. तर जनाबाईंनी 'अरे विठ्या, अरे विठ्या, माझ्या मायेच्या कारट्या, अरे काळतोंड्या..' असे म्हटले. संत तुकारामांची पत्नी आवली आहे देखील विठ्ठलाला शिव्याची लाखोली वाहिली. पण या सगळ्यांच्या बोलण्यातील हा अधिकार त्यांच्या विठ्ठलावरील भक्तीतून आणि प्रेमातून आला. साधारण आठशे -नऊशे वर्षांपासून ही वारीची परंपरा अखंड सुरु आहे. सगळे स्वयंस्फूर्तीने सामील होतात. ज्ञानोबा माउलींच्या आधीपासून वारी सुरु होती असे म्हटले जाते. संत तुकारामांनी वारीत आयुष्यभर खंड पडू दिला नाही. एकदाच ते आजारी असल्याने वारीला जाऊ शकले नव्हते. पण विठ्ठल त्यांच्या ध्यानी मनी होताच. वारीतील पालखी सोहळ्याची सुरुवात तुकोबारायांचे सुपुत्र नारायण महाराज यांनी केली असे सांगितले जाते. वारीतील 'ज्ञानबा तुकाराम' हा गजर तेव्हापासूनच सुरु झाला. वारीमध्ये शिस्त आणण्याचे काम गुरु हैबतबाबा यांनी केले. ती शिस्त आजही कायम आहे. इथे शिस्तीसाठी पोलीस बंदोबस्ताची आवश्यकता नसते. ती स्वयं स्फूर्तीने पाळली जाते. वारी म्हणजे खरोखरच एक जिताजागता चमत्कार आहे. अनेक बुद्धिवादी, निरीश्वरवादी वारीच्या कुतूहलापोटी त्यात सामील झाले. पण वारीची जादू अशी की ते सुद्धा विठ्ठलनामाच्या गजरात रंगून गेले. इरावतीबाई कर्वे या महान विदुषी आणि थोर साहित्यिक. वारीच्या कुतूहलापोटी वारीत सामील झाल्या. खरंच जादू घडली. सावळ्या विठ्ठलाची जी मोहिनी त्यांच्यावर पडली ती कायम चीच! इरावतीबाई देहभान हरपून वारकऱ्यांसोबत नाचायला लागल्या. आज अगदी आय टी क्षेत्रातील बुद्धिमान तरुण मुलं मुली या वारीत सामील होतात. परदेशी पाहुणे देखील यात हजेरी लावतात. वारीकडे निकोप दृष्टीने पाहिले तर वारी एकतेचा संदेश देणारी आहे. 'मानव तितुका एक आहे' हे सांगणारी आहे.

विठ्ठल हे श्रीमंत दैवत नाही. त्याला सोन्याचा मुकुट वगैरे गोष्टी नको असतात. हवी असते ती निर्मळ भक्ती, शुद्ध अंतःकरण. मानवी जीवनाला श्रीमंत करणारी जी चिरंतन मूल्ये आहेत, तीच वारी आणि विठ्ठल आपल्याला देतो. सदाचार, पावित्र्य, नीतिमत्ता, करुणा, अनासक्ती या मूल्यांची शिकवण देणारं जगातलं सर्वात मोठं विद्यापीठ म्हणजे वारी. आज या मूल्यांचीच जगाला गरज आहे. विठ्ठल सोयरा असा विलक्षण आहे. सगळ्यांशी आपुलकीचं नातं जोडणारा. 'बोलावा विठ्ठल, पाहावा विठ्ठल करावा विठ्ठल जीवभाव' असं संत तुकाराम महाराजांबरोबर आपणही म्हणू या. माउली म्हणतात,

**बहुता सुकृताची जोडी। म्हणुनी विठ्ठली आवडी।**

आपले भाग्य थोर म्हणून विठ्ठलाची आवड आपल्याला लागली आहे.

# सुंदर ध्यान



टाळ चिपळ्या मृदुंग
ताल धरी वारकरी
करी विठ्ठल जागर
अश्व रिंगणाची वारी

दाही दिशातून चाले
विठू नामाचा गजर
पाय पंढरीच्या वाटे
विठू भेटीला आतुर


तुडुंब ही चंद्रभागा
भक्तांचे अभ्यगं स्नान
विठ्ठल भेटीची आस
धावत सुटले मन

ग्यानबा तुकाचा घोष
पालखी दिंडी सोबत
नाचती वैष्णवजन
मुखी विठ्ठल कीर्तन


पाहून सुंदर ध्यान
झाली भेट उराउरी
सफल झाली वारी
पायी ठेवावे श्रीहरी

मारुती कटकधोंड

## माझं चित्र...




राजनंदिनी गोविंद भोसले
डोणगांव



## पूर्वसुकृत

आषाढ घन। आनंदी मन।
वारीचा क्षण। नयनी साठवला।।
नयना माजी या। वारकरी पाहिला।
भक्तीचा हा उमाळा। अंतःकरणी।।
अंतरंगी वारी। पाणावले नेत्र।
शहारले गात्र। धन्य झालो।।
धन्य ती वारी। धन्य ते वारकरी।
मुखी राम कृष्ण हरी। जप असे निरंतर।।
अविरत पाय चालती। विठ्ठल विठ्ठल टाळ बोलती।
देहभान विसरून जाती। विठ्ठल नामात।।
नाम घेता विठूचे। सार्थक या नरजन्माचे।
हेच पूर्वसुकृताचे। फळ असे।।

**उमेश मोहोळकर**
भ्र. ९६३७९६७७५५

## जनांची साऊली

विठू तो सावळा। प्रेमाची माउली।
जनांची साऊली। युगायुगे।।१।।

ही पंढरी स्वर्ग। जना भासे तीर्थ।
येई जन्मा अर्थ। दर्शनाने।।२।।

राग, लोभ, द्वेष। सोडू भीमातीरी।
सत्कृत्याची वारी। पदोपदी।।३।।

आषाढ मासाला। संगे वर्षाधारा।
भक्तीचाच वारा। इथे तिथे।।४।।

नाची कामना। विठू पूर्ण करी। जर
श्रद्धा खरी। अखंडीत।।५ ।।

ज्ञानोबा तुकोबा। भक्त विठ्ठलाचे।
ऐकावे संताचे। जन्मोजन्मी।।६।।

असू द्यावी श्रद्धा। त्या विठोबा वर।
तरेल संसार। सुखासुखी।।७।।

**कविता दाते**



# साधन ते सार पंढरीची वारी

आषाढी विशेष

**ज्ञानेश्वर पाटील, भागवताचार्य**

**भारतीय** तत्त्वज्ञानात चार प्रकारचे पुरुषार्थ सांगितले आहेत. धर्म,अर्थ,काम,मोक्ष यामध्ये मोक्ष हा पुरुषार्थ मानवी जीवनाचे अंतिम ध्येय किंवा मोक्ष पुरुषार्थ हा सर्वश्रेष्ठ सांगितला आहे. मानवी जीवनात मोक्षप्राप्तीनंतर कोणत्याही प्रकारची इती कर्तव्यता राहत नाही असे आपले भारतीय तत्त्वज्ञान सांगते. परंतु वारकरी संप्रदायातील संतांनी मोक्ष पेक्षा ईश्वराची भक्ती हीच सर्वश्रेष्ठ आहे असे सांगितले आहे.

श्री तुकोबाराय म्हणतात मोक्ष प्राप्त होऊनही ईश्वराची भक्ती नसेल तर त्या ज्ञानाचा काहीही उपयोग नाही. ईश्वराची भक्ती करणारा भक्तच सर्वश्रेष्ठ आहे.

जाणे भक्तीचा जिव्हाळा
तोचि दैवाचा पुतळा
अनेक नये माझे मना
हो का पंडित शहाणा

संत म्हणतात मोक्षापेक्षा भक्ती सुख हेच सर्वश्रेष्ठ सुख आहे. त्या भक्ती सुखासाठी आम्ही मोक्षसुखालाही मागे टाकलेले आहे.

मोक्ष पदे तुच्छ केली या कारणे
आम्हा जन्म घेणे युगायुगी किंवा
तुका म्हणे गर्भवासी
सुखे घालावे आम्हासी

म्हणजे संतांच्या दृष्टीने भक्तिमार्ग हाच सर्वश्रेष्ठ मार्ग आहे. याच भक्ती मार्गाचा सर्व भक्तांनी एकत्रित येऊन घेत-लेला आनंद किंवा एकसंघ आनंद म्हणजे पंढरीची वारी आहे. प्रातःस्मरणीय गुरुवर्य मामासाहेब दांडेकरांनी वारकरी शब्दाची व्याख्या करताना ज्ञानोबारायांच्या प्रमाणाचा पुरावा दिला आहे.

काया वाचा मने जीवे
सर्वस्वे उदार
बाप रखुमादेवीवरु विठ्ठलाचा
वारीकर

काया वाच मनाने जीवावरती उदार होऊन जो पंढरीची वारी करतो त्यालाच वारकरी असे म्हणतात. म्हणजे वारी करणारा हाच वारकरी आहे अशी व्याख्या स्पष्ट आहे. म्हणून वारकरी संप्रदायाच्या दृष्टीने पंढरीची वारी हा वारकऱ्यांनी एकसंघ येऊन घेतलेला सर्वोच्च आनंद आहे.



वारी ही एकट्याने करायची भक्ती नाही तर ती सर्वांना सोबत घेऊन भक्ती सुख शेअरकरण्याची वारी आहे.

वारकरी संप्रदायाचे अनेक वैशिष्ट्ये आहेत यात पंढरीची वारी हे एक महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे.

पंढरीची वारी ही वारकऱ्यांना वर्षभर पुरणारी भक्तीची शिदोरी असते.

नाचत जाऊ त्याच्या गावा रे खेळिया
सुख देईल विसावा रे किंवा
गात जागा गात जागा
प्रेम मागा विठ्ठला

तत्त्वज्ञानात म्हटलेले आहे पंढरीची वारी म्हणजे केवळ पायी चालण्याची परंपरा नसून सदेह वैकुंठाची वाट चालणे आहे. पंढरीची वारी म्हणजे काय तर आत्म्याने परमात्म्यापर्यंत केलेला प्रवास म्हणजे पंढरीची वारी.भक्ती सुखाच्या अतृप्तीपासून भक्ती सुखाच्या तृप्तीपर्यंत केलेली भक्ती म्हणजे पंढरीची वारी.

जीवनाचे सुखदुःख बाजूला ठेवून आत्मानंदापर्यंत केलेला प्रवास म्हणजे पंढरीची वारी. मनुष्यता पासून मानवतापर्यंत केलेला प्रवास म्हणजे पंढरीची वारी. आणि जीवाने शिवापर्यंत केलेला प्रवास म्हणजे पंढरीची वारी.

पंढरीची वारी हे समतेचे तत्त्वज्ञान आहे. पंढरीची वारी हा समाज परिवर्तनाचा अनोखा संदेश आहे. वारी म्हणजे समर्पण आणि त्यागाचे प्रतीक आहे.

स्वतःबद्दल असलेला अहंकार, मीपणा, माझे पणा हे सगळं पायी चालताना स्वतःच्या पायदळी तुडवून फक्त आणि फक्त माऊली माऊली या लीनतेच्या नम्र भावाचा समाज परिवर्तनाचा संदेश याच वारीच्या माध्यमातून जगापर्यंत पोहोच होतो आणि साने गुरुजींच्या शब्दाची आठवण होते प्रभूची लेकरे सारी या दृष्टीने प्रत्येकाच्या मुखात काही झालं तरी फक्त माऊली माऊली हाच नामजप अखंड रात्रंदिवस वारीच्या वाटेवर ओसंडत असतो. पंढरीच्या वाटेवर चालणं असतं पण हे चालणं कोणालातरी मागे टाकून नसतं तर सर्वांना सोबत घेऊन चालणं असतं.

स्वतःच्या अहंकाराचा निचरा होऊन नम्रतेने जन्म घेतलेली अवस्था याच पंढरीच्या वारीत पहावयास मिळते आणि स्वतःची स्वतःबरोबर अनोखी ओळख होते ती सुद्धा फक्त माऊली माऊली...!!

## आलो आषाढीला...

आलो आषाढीला विठू तुझ्या पंढरीत।
तुझ्या दर्शनाची आस रे माझ्या मनात

वाळवंटी होते दिंड्या पताकांची दाटी।
मुखी विठू नाम घेताना तू आहे पाठी

ज्ञानोबा तुकोबा, शेगाव श्री गजानन ।
दिंड्यातील वारकरी म्हणती भजन

लाख लाख वारकरी येतो पंढरीत
तुझ्या दर्शनाची आस प्रत्येक मनात।।

पुंडलिक दर्शन,चंद्रभागेचे स्नान
नाम गर्जे वाळवंटी भजन कीर्तन

चोखा नामा पायरीसी सारे होती लीन ।
तुझ्या आधी दर्शनाचा भक्ता मिळे मान

आषाढीला होता विठू तुझे रे दर्शन
वारकरी तृप्त, हरवतो देहभान

**गिरीश दिवाकर दुनाखे**
मोबा: ९६२३२३१४६३

## वारी आषाढीची...

पावलांना ओढ । पंढरीची लागो ।।
ध्यास मना लागो । आळंदीचा ।।१।।

काया वाचा आता । देहुत नांदावी ।।
पाऊली खेळावी । नाथा घरी ।।२।।

अभिर गुलाल । उधळावा नित्य ।।
वाणी बोले सत्य चोखोबाची।।३।।

मातीशी अद्वैत । साधावे अभंग ।।
गोरोबाचा संग । घडो जीवा ।।४।।

चंद्रभागा दावी । परब्रम्ह रूप ।।
पाहता स्वरूप । धन्य झालो ।।५।।

**ज्ञानेश्वर कुलकर्णी** (वतनी)





## ।। वारी ।।

पंढरीनाथा क्षमा करी
केली नाही कधी वारी

लहानपणी इच्छा उरी
वारीचा सतत हट्ट धरी
धाक बा चा लई भारी
नेले ना मला बरोबरी
केली नाही कधी वारी

वारीला जातात सारी
मुलगी म्हणून मी घरी
काम करी लहान जरी
घरी असावे कुणी तरी
केली नाही कधी वारी

राबत राहिले रे वावरी
मळा नि फळा सावरी
घरचीचं आवराआवरी
वारीचामोह मी आवरी
केली नाही कधी वारी

लग्न झाले तशीचं परी
मोठीझाली गुलामगिरी
रांधा वाढा काम भारी
वारीला जाय कारभारी
केली नाही कधी वारी

कर्जात बुडले शेतकरी
फाशी घेतोयं कारभारी
पडे मजवर जबाबदारी
सांभाळते मी पोरं पोरी
केली नाही कधी वारी

झालेआता मी म्हातारी
माझं जगणं रं अधांतरी
अवघड वारी आतातरी
नेशील इथून तीचं वारी
केली नाही कधी वारी

**हेमंत मुसरीफ पुणे**
९७३०३०६९९६..

## भक्ती विठुरायाची....

मन वढाय वढाय
विठुरायाच्या ध्यानात
कानो कानी चा निरोप
घुमतो विठूच्या कानात।।

गरीब श्रीमंत नाही भेद
वाली साऱ्या दुनियेचा
तुम्हा-आम्हा नाही ठाव
डाव अवघा सावळ्याचा।।

दंग व्हावे भक्ती मध्ये
कृष्णकांत तनमनात
वाहिलं तोच भार सारा
त्रागा नको प्रपंचात।।

थोडे आहे, थोडेच असावे
एकरूपता भक्तीची
समाधान सार्थकतेचे
साक्ष परमानंदाची।।

राम कृष्ण हरी, राम कृष्ण हरी
तुळशीमाळ जपता
अखंड आशीर्वच तयाचा
शेवटास प्राप्त।।

**राजश्री जाधव**